# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २६.०५.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २५.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये १० ईसमांवर कारवाई करून १५,०१,७२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमांवर कारवाई करून, १५,७४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३४१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०५,१००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) जरीपटका पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २६.०५.२०२६ चे ०२.३५ वा. ते ०४.३० वा. चे दरम्यान, जरीपटका पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, निर्मल कॉलोनी रोड, अशोका रसोई जवळ एका निळ्या रंगाचे ॲक्सेस मोपेड गाडीवरील ईसम एम.डी. पावडर विक्री करीता उभा आहे. अशा माहीतीवरून घटनास्थळी गेले असता, तेथे दोन ईसम निळ्या रंगाचे मोपेडजवळ उभे असलेले दिसुन आले. पोलीसांना पाहताच एक ईसम पळुन गेला. संशयीत ईसम त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मोहम्मद सादीक मोहम्मद रफीक अन्सारी, वय ३४ वर्ष, रा. डोबी अन्सार नगर, मोमीनपुरा, नागपुर असे सांगीतले. पळुन गेलेल्या ईसमाचे नांव पत्ता विचारले असता, त्याचे नांव ईमरान कुरेशी वल्द बब्बु कुरेशी, वय ४० वर्षे, रा. अन्सार नगर, मोमीनपुरा, नागपुर असे सांगीतले. मिळालेल्या ईसमाची एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातून एका झिपलॉक पन्नीमध्ये २ ग्रॅम १९ मिलीग्राम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन व मोपेड क्र. एमएच ४९ सिएच ८७९८ असा एकुण किंमती १,२०,०००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने,

आरोपीविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पळुन गेलेल्या आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, सपोनि. शशिकांत तायडे, पोउपनि. देवचंद सहारे, अनंता गारमोडे, पोहवा. संदीप गुप्ता, नितीन राणे, पोअं. आशिष व प्रकाश यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कपीलनगर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २६.०५.२०२६ चे ०१.४५ वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, प्रभात कॉलोनी येथे एका काळ्या रंगाची स्प्लेंडर गाडी मागे नंबर नसलेली ज्यावर ट्रिपल सिट जात असलेले ईसमांवर संशय आल्याने त्यांचा पाठलाग करून, त्यांना थांबविले असता त्यांचा एक सोबती तेथुन पळुन गेला. उर्वरीत दोन ईसमांना ताब्यात घेवुन, पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव १) आयुष उर्फ मल्ल्या विनोद मेश्राम, वय २५ वर्षे, रा. बेझनबाग, जरीपटका, नागपूर २) येशुदास उर्फ सैंकी अरविंद परमार, वय २४ वर्षे, रा. लष्करीबाग, पाचपावली, नागपुर असे सांगीतले. त्यांची अंगझडती घेतली असता, आरोपी क्र. १ याचे ताब्यातुन ०१ लोखंडी चाकु किंमती २००/—रू. चा मिळुन आला. आरोपी क्र. २ चे ताब्यातुन स्प्लेंडर मोटारसायकल जीचे समोरील भागात एम एच ४९ सि यु ४०८९ नंबर असलेली असा एकुण किंमती २०,२००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन संशयीतरित्या फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कपीलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह. का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. घटनास्थळाहुन पळुन गेलेल्या संशयीताचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २५.०५.२०२६ चे १२.४५ वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. १२, महादेव नगर, पोलीस कॉलोनी तरोडी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सचिन मनोहर हुड, वय ३८ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन मुलाचे ॲडमिशन करीता बाहेर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख १,६०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,७३,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. सागर गायकवाड ८४५९१९७८९० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे पाचपावली :—** दिनांक २५.०५.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, अशोक चौक येथे एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ४५ वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल वार्ड नं. ३९ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान

डॉक्टरांनी त्यांना २३.४५ वा. चे सुमारास तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. कुणाल शेडमाके ८९५६३८९८२८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे ईमामवाडा :—** दिनांक २५.०५.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत, मेडीकल चौक ते उंटखाना रोड, हल्दीराम हॉटेल जवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यांप्रकरणी फिर्यादी रितेश कमलेश गौर, वय १९ वर्ष, रा. अंबे नगर, पारडी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे ईमामवाडा येथे मपोउपनि. नेहा कोंडेकर ९६६५१५६७७३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे हिंगणा :—** दिनांक २६.०५.२०२६ चे ०७.५० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, युको बॅकेचे मागे, रायपुर, हिंगणा, जि. नागपुर येथे एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे, रंग सावळा, चेहरा गोल, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट २ इंच, अंगात निळ्या रंगाची टि—शर्ट व नेव्ही ब्लयु रंगाची अंडरवियर घातलेले वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता एम्स हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे हिंगणा येथे मपोउपनि. गायत्री चव्हाण यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अंबाझरी :—** कु. राखी रंजीतसिंग गहलोत, वय २२ वर्षे, रा. संजय नगर, पांढराबोडी, हनुमान मंदीर जवळ, नागपूर ही दिनांक १५.०५.२०२६ चे १९.०० वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे लांब, अंगात— हिरव्या रंगाचा सलवार सुट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** यशवंत विठ्ठल भारती, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. २६८, आकाश नगर, मानेवाडा रिंगरोड, नागपूर हे दिनांक ०८.०५.२०२६ चे १४.०० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ४ इंच, डोळे— घारे, केस— काळे, अंगात— गुलाबी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.





कु. राखी यशवंत

स्वा/—

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.